9-अ

# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/११६

गोपनीय

क्र.२/२०२२-२३

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील २४ ऑगस्ट, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा गुरुवार **दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी ११.३० वाजता** आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आली.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु.क्र. | मा. सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य | उपस्थित |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य | अनुपस्थित |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य | उपस्थित |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य | उपस्थित |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य | अनुपस्थित |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य | उपस्थित |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य | उपस्थित |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य | उपस्थित |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य | उपस्थित |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य | उपस्थित |
| १४. | डॉ. बी.एन. जगताप | सदस्य | अनुपस्थित |
| १५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| १६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १८. | श्री. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| १९. | डॉ. कविता लघाटे (प्र.कुलसचिव) | सदस्य सचिव /निमंत्रित | उपस्थित |
| २०. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |

➢ श्रध्दांजली :-

**श्री. प्रदीप पटवर्धन**

मराठी चित्रपटसुष्टीतील ज्येष्ठ अभिनेते श्री. प्रदीप पटवर्धन यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०९ ऑगस्ट २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६४ वर्षाचे होते.

**श्री. बाबूराव पाचर्णे**

शिरूय हवेलीच्या राजकारणातील माजी आमदार श्री. बाबूराव पाचर्णे यांचे अल्पशा आजराने दिनांक ११ ऑगस्ट २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षाचे होते.

**श्री. विनायक मेटे**

शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष माजी आमदार श्री. विनायक मेटे यांचे भीषण अपघातात दिनांक १४ ऑगस्ट २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५२ वर्षाचे होते.

**श्री. राकेश झुनझुनवाला**

भारतातील सर्वांत श्रीमंत आणि मुरब्बी गुंतवणूकदार आणि उद्योगपती श्री. राकेश झुनझुनवाला यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १४ ऑगस्ट २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षाचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दि. **२८ जुलै**, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिशदेच्या मान्यतेस्तव सादर. | का.प्रा.वि. |
| ठराव | दि. **२८ जुलै**, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र प्राप्त केलेल्या संस्थेच्या अंतिम मान्यतेसाठी तज्ञ समितीचा अहवाल अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी तसेच शासनास शिफारस करण्यासाठी सादर. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी) सुरु करण्याकरिता शासन निर्णय, क्र. १) मान्यता-२०२२/(११४/२२)/मशि-४ दिनांक ०४ ऑगस्ट, २०२२ व २) मान्यता - २०२२/(११४/२२) (१)/मशि-४ दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ नुसार ईरादापत्र प्राप्त केलेल्या २३ संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधा तपसण्याकरिता गठीत केलेल्या तज्ञ समितीचे अहवाल, अधिष्ठाता मंडळाचे अभिप्रायसह अवलोकन करून ३० पात्र संस्थाचे प्रस्ताव 'परिशिष्ट-क' प्रमाणे शासनाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| ३ | अस्थायी/तात्पुरत्या स्वरूपातील वीजतंत्री, वीजतंत्री मदतनीस, सुतार, सुतार मदतनीस यांना गणवेश, स्वेटर, रेनकोट, हातमोजे व शूज मिळण्याबाबत | विद्यानगरी प्रशाकीय विभाग |
| ठराव | अस्थायी/तात्पुरत्या स्वरूपातील वीजतंत्री, वीजतंत्री मदतनीस, सुतार, सुतार मदतनीस यांना गणवेश, स्वेटर, रेनकोट, हातमोजे व शूज देण्यास मान्यता देण्यात आली. | |
| ४ | माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DICT), मुंबई विद्यापीठ येथे शिक्षकेत्तर तांत्रिक पदे बाहययंत्रणेमार्फत भरणेबाबत. | मा.सं. विकास कक्ष |
| ठराव | माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DICT), मुंबई विद्यापीठ येथे विभागाच्या आवश्यकतेनुसार खालील शिक्षकेत्तर तांत्रिक पदे नेशनल इंफॉर्मेटिक्स सेंटर सर्विसेज इंकॉर्पोरेटेड (NICSI) च्या मार्फत भरण्यास मंजुरी देण्यात आली.<br>१. Information Security Expert(1 Post).<br>२. Network Engineers (2 Post).<br>३. Junior Programmer (1 Post). | |
| ५ | विद्यापीठ वर्षवृत्त २०२१-२२ च्या मसुद्यास मान्यता मिळणेबाबत. | प्रकाशन विभाग |
| ठराव | विद्यापीठ वर्षवृत्त २०२१-२२ च्या मसुद्यास मान्यता देण्यात आली. | |
| ६ | eGov-SAMARTH software and services for University of Mumbai. | माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान विभाग |
| ठराव | It is resloved that the eGov-SAMARTH software and services for University of Mumbai be accepted. This software is free for University. First year cloud services are free by the Central Government. The expenses for the cloud services will be borne by the University in the subsequest years. | |
| ७ | Approval of Minutes of Building and Works Committee dated 30th July, 2022. | |
| ठराव | The minutes of Building and Works Committee dated 30th July, 2022 were accepted. | |
| ८ | सोबत सचिव, सुमन एज्युकेशन सोसायटीचे, एल. एन. कॉलेज, सुमन एज्युकेशन सोसायटी कॅम्पस, फ्लॅट नं.८९, जनरल करिअप्पा उड्डाणपुलाजवळ, राजेंद्र नगर बोरिवली (पूर्व), मुंबई - ४०० ००६ या महाविद्यालयाचे पत्र क्र.४५७, दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी सुमन एज्युकेशन सोसायटीचे, एल. एन. कॉलेज ऑफ नाईट डिग्री कॉलेज ऐवजी सुमन एज्युकेशन सोसायटीचे, लक्ष्मी नारायण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सुमन एज्युकेशन सोसायटीचे, एल. एन. कॉलेज ऑफ नाईट डिग्री कॉलेज ऐवजी सुमन एज्युकेशन सोसायटीचे, लक्ष्मी नारायण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय असा महाविद्यालयाच्या नावात बदल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ व महाराष्ट्र सरकारचे वेळोवेळी जाहीर | |

| | | |
|---|---|---|
| | सबंधित परिपत्रकाच्या अटीच्या अधीन राहून खालील बदल करण्यास मान्यता देण्यात आली.<br>१.**संलग्नता शुल्क व इतर शुल्काबाबत ना हरकत प्रमाणपत्र.**<br>२.**विद्यापीठाच्या अकॅडेमीक ऑडीट पोर्टलवर अकॅडेमीक ऑडीट डेटा अपलोड केल्याबाबतचा दाखला.**<br>३.**महाविद्यालय विकास समिती गठीत केल्याबाबतचे पत्र.**<br>४.**महाविद्यालयातील सेल्फ फायनान्स अभ्यासक्रमाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांना नियमित वेतन देण्यात येत असल्याचे प्रतिज्ञापत्र.** | |
| ९ | मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या सिंधू स्वाध्याय केंद्रासाठी (Centre for Excellence in Marine Studies 'CEMAS') वेगुर्ला नगरपरिषद येथील जागा भाडेतत्वावर विद्यापीठास उपलब्ध करून देण्याकरिता मुंबई विद्यापीठ, मुंबई व वेगुर्ला नगरपरिषद यांच्यात होणाऱ्या करारनाम्याच्या मसुद्यास मान्यात देण्याबाबत | |
| ठराव | मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या सिंधू स्वाध्याय केंद्रासाठी (Centre for Excellence in Marine Studies 'CEMAS') वेगुर्ला नगरपरिषद येथील जागा भाडेतत्वावर विद्यापीठास उपलब्ध करून देण्याकरिता मुंबई विद्यापीठ, मुंबई व वेगुर्ला नगरपरिषद यांच्यात होणाऱ्या करारनाम्याच्या मसुद्यास मान्यात देण्यात आली. | |
| १० | कालिना आणि फोर्ट परिसरातील व्यवस्थापन परिषदेच्या Hybrid mode मध्ये बैठकांकरिता स्क्रीन, अत्याधुनिक संगणक, कॅमेरे आणि माईकची व्यवस्था करण्याबाबत | माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान विभाग |
| ठराव | कालिना आणि फोर्ट परिसरातील व्यवस्थापन परिषदेच्या Hybrid mode मध्ये बैठकाकरिता स्क्रीन, अत्याधुनिक संगणक, कॅमेरे आणि माईकची व्यवस्था करण्याकरिता मंजुरी देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| ११ (आयत्या वेळेचा प्रस्ताव) | मुंबई विद्यापीठाच्या UMAA (University of Mumbai Alumni Association) च्या २३ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेनुसार मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग तसेच संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी करियर समुपदेशन तसेच परदेशी जाणा-या सर्व मुलांना संपूर्णपणे समुपदेशन देण्यासंदर्भातील सुविधा देण्याची जबाबदारी मुंबई विद्यापीठाने UMAA कडे देण्यास मान्यता देण्याबाबत... | विद्यार्थी विकास कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या UMAA (University of Mumbai Alumni Association) च्या २३ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विनंतीनुसार मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग तसेच संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी करियर समुपदेशन तसेच परदेशी जाणा-या सर्व मुलांना समुपदेशन देण्यासंदर्भातील सुविधा देण्यासाठी मुंबई विद्यापीठाने स्थापन केलेल्या सेंटर फॉर नॅशनल अँड इंटरनॅशनल स्टुडंट्स सर्पोट अँड लिंकेज्स व UMAA यांनी एकत्रित सहकार्याने कार्य करावे असा ठराव मान्य करण्यात आला. | |

कुलसचिव (प्र.)

~~प्र-कुलगुरू~~

मा. कुलगुरू